|| Shree Gurudev ||

# Vandaniya Rastrasant Shri Tukdoji Maharaj Seva Samiti, Akola

**Register No. Mh/340/AF/1798**

## 6th Statelevel Rastrasant Shri Tukdoji Maharaj Vichar Sahitya Sammelan

**24, 25 of November 2018**




## CERTIFICATE

This is to certify that Mr./Mrs./Miss./Dr. प्रा. सुधाकर बंडू मनवर of श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी. has Participated and Presented a paper tittle ''वंदनीय राष्ट्रसंतांच्या कार्यात संगीताची भूमिका' in the Two days Statelevel Rastrasant Shri Tukdoji Maharaj Vichar Sahitya Sammelan on 24, 25 November 2018.

His / her paper has been included in the conference proceedings bearing the AJANTA – ISSN – 2277 – 5730 with 5.5 Impact Factor.

Convener & Vice President
(RTMSSS)
**DR.RAJIV BORKAR**

President (RTMSSS)
**RAMESHWAR BARGAT**

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

An International Multidisciplinary Quarterly Research Journal

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

ISO 9001:2008 QMS
ISBN / ISSN

Volume - VII, Issue - IV, October - December - 2018
ISSN 2277 - 5730

# AJANTA

**Impact Factor - 5.5 (www.sjifactor.com)**

**Is Hereby Awarding This Certificate To**

प्रा. सुधाकर बंडू मनवर

**As a Recognition of the Publication of the Paper Entitled**

वंदनीय राष्ट्रसंतांच्या कार्यात संगीताची भूमिका

**Ajanta Prakashan**
Jaisingpura, Near University Gate,
Aurangabad. (M.S.) 431 004
Mob. No. 9579260877, 9822620877
Tel. No.: (0240) 2400877,
ajanta1977@gmail.com, www.ajantaprakashan.com

**Editor : Vinay S. Hatole**

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII Issue - IV October - December - 2018

ENGLISH / MARATHI PART - II / HINDI

Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER -DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| Sr. No. | Name & Author Name | Page No. |
|---|---|---|
| १५ | राष्ट्र उभारणीसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची एक चळवळ<br>**प्रा. डॉ. दीपक चौरपगार** | ६२-६४ |
| १६ | वंदनीय राष्ट्रसंताच्या स्वप्नातील भारताची जडण घडण<br>**डॉ. सुपर्णा मुरकुटे** | ६५-६७ |
| १७ | राष्ट्रसंतांचे स्त्री सबलीकरण व महिलोन्नती विषयक विचार<br>**प्रा. डॉ. ममता इंगोले** | ६८-७७ |
| १८ | राष्ट्रसंतांचे स्त्रि सबलीकरण व महिलोन्नती विषयक विचार<br>**सह. प्रा. सौ. सी. एम. खंडारे** | ७८-८० |
| १९ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे साहित्य एक विचार<br>**प्रा. सचिन सुरेशराव बंडगर** | ८१-८३ |
| २० | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा सांगितीक दृष्टीकोन<br>**सहा. प्रा. सुशील अ. वावरकर** | ८४-८६ |
| २१ | राष्ट्रसंताचे ग्राम सुधारणा विषयक विचार<br>**डॉ. अनिता जानराव चव्हाण** | ८७-८९ |
| २२ | वैचारिक मूल्यांची सामाजिक वाङमयीन चिकित्सा : एक शोध<br>**डॉ. अनिलकुमार ब. दडमल** | ९०-९३ |
| २३ | वंदनीय राष्ट्रसंतांच्या कार्यात संगीताची भूमिका<br>**प्रा. सुधाकर बंडू मनवर** | ९४-९६ |
| २४ | वंदनीय राष्ट्रसंताच्या स्वप्नातील भारताची जडणघडण<br>**प्रा. डॉ. प्रमोद डी. वैद्य**<br>**प्रा. डॉ. अर्चना ना. गवई** | ९७-१०१ |
| २५ | राष्ट्रयंतसख्स वैज्ञानिक दृष्टिकोन<br>**डॉ. सुनिता सुभाष बाभुळकर** | १०२-१०६ |
| २६ | राष्ट्रसंतांच्या भजनावली आणि कीर्तनातून संगीताद्वारे समाजप्रबोधनाचा सांस्कृतिक वारसा<br>**प्रा. विजय राधाकृष्ण आळशी** | १०७-११० |
| २७ | राष्ट्रसंताचे स्त्री विषयक विचार<br>**डॉ. विजयसिंग किसनराव पवार** | १११-११२ |

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २३. वंदनीय राष्ट्रसंतांच्या कार्यात संगीताची भूमिका

**प्रा. सुधाकर बंडू मनवर**
श्री गणेश कला महाविद्यालय, कुंभारी.

भारतीय संगीत हा सर्व जगाचा कुतूहलाचा आणि तेवढाचा आदर आणि आवडिचा विषय आहे. कारण भारतीय संगीत हे अध्यात्माच्या खूप समिप आहे. आपल्या देशामध्ये त्यातल्या त्यात महाराष्ट्रामध्ये खूप मोठी संत परंपरा लाभली आहे. यामध्ये पंधराव्या शतकापासुन ते आतापर्यंत होऊन गेलेल्या संताचे कार्य आपल्याला अवगत आहे. संत एकनाथ, संत गोरखनाथ, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत जनाबाई, संत चोखोबा यांसारखे अतिशय ताकदीचे संत आपल्या महाराष्ट्रात व देशात होऊन गेलेत. या संतांचे कार्यावलोकन केल्यानंतर आपल्या असे लक्षात येते की, समाजसुधारणे करीता या थोर संतांनी संगीताचा अतिशय यथोचित व ताकदीने उपयोग केलेला आहे. या सर्व संत मंडळींनी त्यांचे अभंग असतील, ओव्या असतील किंवा जे काही त्यांचे लिखाण असेल ते एका विशिष्ट साचेबध्द स्वरुपात केलेले आहे, एका विशिष्ट लयीमध्यें केलेले आहे. आणि हे बरेचसं गेय स्वरुपात समाविष्ट होणार साहित्य आहे. त्यामुळे आपण पाहतो की संतानी रचलेली अभंगवाणी हा अनेक थोर शास्त्रीय संगीत विद्वानांनी आपल्या सामर्थ्यशाली गायनाने अजरामर करुन ठेवलीत.

एखादा विचार समाजमनावर अधिक जोरकसपणे जर बिंबवायचा असेल तर संगीता सारखे दुसरे माध्यम नाही ही गोष्ट आपण सर्व जाणतोच. संतांनाही ही गोष्ट खुप चांगल्या तऱ्हेने अवगत असावी. म्हणूनच त्यांनी संगीताची कास धरुन आपला विचार किंवा वाङमय समाजाला सांगण्यासाठी संगीत उपयोगात आणले.

महाराष्ट्रातील आधुनिक संत परंपरेतील जे संत आहेत त्यात आपल्या विदर्भ भुमिचे दोन दैदिप्यमान ताऱ्यांप्रमाणे प्रखरतेने चमकणारे महान व थोर संत आपल्या स्मरणात येतात, ते म्हणजे पहिले वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व दुसरे वैराग्यमुर्ती संत गाडगे बाबा या दोघांच्या ही जीवनकार्याचा आपण जर अभ्यास केला तर आपल्या असे लक्षात येईल की, संगीत विषयाची कास धरुनच त्यांनी समाजमनात आपला विचार बिंबविला.

राष्ट्रसंतानी आपल्या जीवनामध्ये विपूल साहित्य लेखन केले. जगप्रसिध्द "ग्रामगीता" ही महाराजांच्याच सीध्दहस्त लेखणीतून अवतरलेली आहे. त्यासोबतच हजारो-शेकडो भजने महाराजांनी रचली व आपल्या हृदयाचा ठाव घेणाऱ्या त्यांच्या भारदस्त व गोड आवाजातून जनसामान्यांपर्यंत पोहोचवली. राष्ट्रसंतांनी समाजाचे अत्यंत सुक्ष्मपणे निरीक्षण केले. तळागळातील गोरगरीब व भोळाभाबडा

समाज व्यसनांधतेत व अंधश्रध्दे्च्या खायीत पडला होता. समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे केवळ भाषां, व्याख्याने किंवा तत्वज्ञानाच्या गोष्टी सांगून अपेक्षीत परिणाम साधणे हे महा कटीण कार्य आहे हे राष्ट्रसंत जाणून होते. म्हणुनच राष्ट्रसंतांनी त्यांना लाभलेल्या अभिजात गोड आवाजाच्या सहाय्याने खंजेरी हाती घेऊन भजनांच्या माध्यमातून जनमानसांवर मोहीनी टाकली. खंजेरीच्या खड्या व लयबध्द झंकारातून संगीताच्या नादातून विविध भजनांव्दारे जनसामान्यांची

मने जिंकली. लोकांना संगीताच्या माध्यमातून नादामध्ये रममान करुन हळुवार समाजोपयोगी विषय लोकमानसांच्या मनावर बिंबविला, खंजेरी, टाळ, मृदुंग, तबला, चिपळया इ. मधुर वाद्य-स्वरांसोबतच त्यांच्या गोड-भारदस्त व मोहक आवाजाकडे अखिल समाज आकर्षिला जावू लागला.

तुने रे भाई, सच्चा धरम, नहीं जाना ||

खंजेरीतील बोल व्यवसनाधिन लोकांना सांगू लागले.

काहे पीता है शराब | काहे पीता है शराब |

धन भी गवाँया | इज्जत ना पाया |

कुल बदनाम कराया |

अशा प्रकारची भजने तीतक्याच सुंदर, समर्पक व प्रभावी चालीनी सजवून जेव्हा महाराज गात असत तेव्हां अनेक व्यसनाधीन लोक आपले व्यसन कायमचे सोडून देण्याची शपथ घेत असत ऐवढी ताकद महाराजांच्या शब्द आणि स्वरांमध्ये होती.

संगीत ही विशाल व अथांग शक्ती आहे. संगीताच्या तालावर नास्तिक व्यक्ती व दानवही डोलू लागतो. एवढी प्रचंड ताकद संगीतामध्ये आहे. म्हणूनच राष्ट्रसंतांना समाजकार्याकरीता संगीताचा प्रभाविपणे उपयोग करता आला. त्यांनी कधी चित्रपट गीतांच्या चालींवर आधारीत, भजनांच्या रचना केल्यात तर कधी पारंपारीक व लोकांना सहज अवगत होतील अशा चालीवर शब्दरचना करुन राष्ट्रसंतांनी त्या सर्वसामान्य जनते पर्यंत पोचवल्या. त्यावेळी महाराजांच्या कार्यक्रमाला पन्नास-पन्नास हजार लोकांची गर्दी व्हायची व कार्यक्रमस्थळाला यात्रेचे स्वरुप प्राप्त व्हायचे. भजनांचा प्रभाव लोकांवर इतका व्हायचा की अनेक लोक भजन ऐकून प्रभावित व्हावयचे व आपले जीवन अमुलाग्रपणे बदलावयाची शपथ घ्यायचे. अनेक गावांमध्ये तर नित्यनेमाने भजने सामुदायिक प्रार्थना होऊ लागल्या. एकुणच राष्ट्रसंतांचा उपजत गोड व पहाडी आवाज. खंजेरीची प्रभावी व मधुर थाप, एकतारीचा सुरेल झंकार, मृदंग व तबल्याचा लयकारीयुक्त ठेका, हार्मोनिअमची सुरेल साथ टाळ-चिपळयांची समर्पक साथ या सर्व सांगीतिक
साधनांच्या योग्य मिश्रणाला साजेसे राष्ट्रसंतांचे काव्य हेच राष्ट्रसंतांच्या प्रभावी समाजप्रबोधनाचे अत्यंत महत्वाचे तंत्र होते.

राष्ट्रसंतांनी जीवनाच्या प्रत्येक पैलूवर लिखाण केले व आपल्या लिखाणातून संगीताच्या प्रभावी उपयोगाने हजारो लोकांच्या जीवनात सकारात्मक अमुलाग्र बदल घडवून आणला. राष्ट्रसंतानी आपल्या अदभूत व्यक्तिमत्वातून स्वातंत्र्यपर्वू व स्वातंत्र्योत्तर काळातही दैदिप्यमान असे समाजकार्य केले. सुरुवातीला "मंगलमय नाम तुझे सतत गाऊ दे|" इश्वरभक्तिची भजने गाऊन भक्तिमय बोधामृत पाजणाऱ्या राष्ट्रसंतांनी लोकांना केवळ टाळ कुटण्याच्याच नादी नाही लावले, तर १९४२ च्या चिमूर येथील क्रांतीमध्ये

झाड झडुले शस्त्र बनेगे |

भक्त बनेगी सेना |

पत्थर सारे बम बनेंगे |

नाव लगेगी किनारे ॥

अशी आर्त हाकत ठोकून ब्रिटीशांना ललकारले व ब्रिटीशांचे सिंहासन डगमगायला लागले.

एकदा आपल्या देशाच्या राष्ट्रपती भवनात ही राष्ट्रसंतांची खंजेरी निनादली. गुलजारीलाल नंदा, डॉ. राजेंद्र प्रसाद, पं. नेहरू इ. नेत्यांना तर वं. राष्ट्रसंतांच्या शिस्तबध्द व प्रभावी कार्याने अत्यंत प्रभावित केले. गुरुकूंज आश्रम मोझरी येथे भारताचे पहिले राष्ट्रपती महामहीम डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी वं. राष्ट्रसंतांच्या प्रेरणादायी स्पर्शाने प्रभावीत होऊन "राष्ट्रसंत" ही पदवी महाराजांना बहाल केली. हजारोंच्या संख्येने उपस्थित जनतेच्या टाळयांच्या कडकडातात वं. महाराजांना "राष्ट्रसंत" हे नामाभिधान देण्यात आले.

अशा त-हेने वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाज कार्यामध्ये संगीत या विषयाचे अनन्य साधारण असे स्थान आहे. महाराजांनी संगीताचा समर्पक व प्रभावी उपयोग करुन जनसामान्यांना शहाणे केले. आपला विचार प्रभावीपणे त्यांच्या मनावर बिंबविला ..........

*"जय गुरु"*